3. भारतीय अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप

CHANGING SCENARIO OF INDIAN ECONOMY

If

Dr. Smt. Rajani v. Sontakke

Associate professor

Economics

भारतीय अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप

- भारतीय अर्थव्यवस्था ही ग्रामीण भागाशी निगडीत आहे कारण भारत हा कृषिप्रधान देश असून भारतातील 80 % जनता ,(सध्या 53 %) ही कृषी व कृषिशी निगडीत इतर व्यवसायांवर अवलंबून आहे.
- 2011 च्या जनगणनेप्रमाणे 68.8 % लोकसंख्या ग्रामीण भागात राहात असून 72.4 % शेती व शेतीशी निगडीत रोजगार करीत आहे.
- मागील काही दशकांपासून शहरीकरणातील संक्रमणा मुळे ग्रामीण लोकसंख्येचा बराच भाग व जीडीपी तील वाटा कमी होतो आहे.
- 2001-2011 दरम्यान, भारताची नागरी लोकसंख्या 31.8 % ने वाढली व ग्रामीण लोकसंख्या 12.18 टक्क्याने वाढली. ह्या काळात शहरी लोकसंख्या ची वाढ 50% एवढी होती, ज्याची विभागणी ही शहरी-ग्रामिन स्थलांतर, ग्रामीण भागातून शहरी भागात पुनरवर्गीकर ण असे होते.

भारतीय अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप

- **तक्ता: सकल घरगुती उत्पादनात विविध क्षेत्रांचा हिस्सा**

(1980-81 च्या किंमतीवर आधारित)

आर्थिक क्षेत्र	1950-51	1970-71	1980-82	1999-2000
1. कृषी व कृषीशी समबंधीत क्रिया	55.4	44.5	38.1	25.2
2. खाण उद्योग व त्याच्याशी सम्बन्ध इत उद्योग	1.1	1.3	1.5	2.3
3. उद्योग (उत्पादन, विद्युत निर्माण, गॅस, पाणीपुरवठा, बांधकाम)	15.0	22.3	24.4	24.7
4. तृतीय क्षेत्र(व्यापार, वाहतूक, दळणवळण)	28.5	31.9	36.6	47.8
एकूण	100	100	100	100

1. कृषी क्षेत्राचा घटता हिस्सा:

राष्ट्रीय उत्पन्नातील कृषि क्षेत्राचा हिस्सा सतत घटत गेला आहे.

1950-51 मध्ये कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा55.4 %होता तो कमी कमी होत जाऊन 1980-81 मध्ये 38.1% वर पोहोचला.

1999-2000पर्यंत आणखी कमी होऊन 25.2% वर पोहोचला.

कृषी क्षेत्राचा घटता हिस्सा हा कमी-कमी होत असल्याचे आर्थिक विकासाचा इतिहासातून निर्देशित हिट आहे.

राष्ट्राच्या आर्थिक विकासाबरोबर राष्ट्रीय उत्पन्नातील प्राथमिक क्षेत्राचा म्हणजेच कृषी क्षेत्राचा हिस्सा कमी -कमी होत जातो हे स्पष्ट होते.

2. औद्योगिक क्षेत्राचा वाढता हिस्सा:

1950-51 मध्ये उद्योग क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा15% होता जो वाढत जाऊन 1980-81 मध्ये24.4% झाला. 1999-2000 पर्यंत तो वाढत जाऊन 24.7% इतका झाला.

औद्योगिक क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाढत जाणारा हिस्सा हा भारतीय अर्थव्यवस्था विकासाकडे अग्रेसर आहे हे दर्शवितो.

1995 च्या जागतिक विकास अहवालानुसार इंग्लंड व अमेरिके च्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात औद्योगिक क्षेत्राचा हिस्सा हा 33 % होता तर जपान ह्या देशाचा 41% हिस्सा होता.

भारताच्या संदर्भात विचार केल्यास तिचा वेग मंद आहे, मॅन्युफॅक्चरिंग चा हिस्सा कमीच आहे त्यामुळे हेच देशाच्या आर्थिक वृद्धीचं दर कमी असण्याचे कारण आहे.

3. सेवा क्षेत्राचा वाढता हिस्सा:

ह्या क्षेत्रात वाहतूक, दळणवळण, व्यापार आणि वाणिज्य आणि बँकिंग आणि विमा क्षेत्र/व्यवसाय, सामुदायिक आणि वैयक्तिक सेवांचा यात समावेश होतो.

1950-51 मध्ये एकूण राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा हिस्सा25.8% होता तो वाढत जाऊन 1980-81 मध्ये36% आणि पुढे 1999-2000 मध्ये वाढत जाऊन 47.8% इतका झाला.

वाहतूक, दळणवळण आणि व्यापार ह्या सेवांचा वाटा11 ते 21.9 टक्क्यांपर्यंत वाढत गेल्याचे दिसून येतो, ह्यावरून पायाभूत सुविधांचा विकास होत असल्याचे स्पष्ट होते.

जागतिक विकास अहवाल1995 प्रमाणे, इंग्लंड व अमेरीका ह्या देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा वाटा65% असून जपानचा 57% आहे

4. रचनात्मक बदलाचे सम्पूर्ण निर्धारण/ मूल्यमापन

- विकासाच्या प्रक्रियेतील हा फार मोठा घडून आलेला बदल होय.
- कृषी क्षेत्राचा कमी होत गेलेला हिस्सा आणि उद्योग व सेवा क्षेत्राचा वाढत गेलेला हिस्सा हाच मुळी रचनात्मक बदलांना दर्शवित आहे.
- आर्थिक विकास होत असला तरी त्याचा वेग मात्र फार कमी आहे आणि आर्थिक विकासाचा वेग वाढविण्याकडे सतत लक्ष दिले जात आहे व सद्यस्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेला जगातील एक मोठी अर्थव्यवस्था म्हणून गणले जाऊ लागले आहे.

shutterstock.com • 248970781